# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१८/०४/२०१९

## दि.१७/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ११७/१९,भादविक १४३,१४७,१४९,३२४,३३७,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | नाझमीन शेख,वय-३७ वर्षे,रा.१०९१,भवानी पेठ,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०४/२०१९ रोजी १८/४५ वा. नानापेठ भाजी मंडई,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुले मिझान व मारुफ हे ज्युस आणण्यासाठी गेली असताना नानापेठ भाजी मंडई,पुणे या ठिकाणी ट्रफिक असल्याने ते रोडवर थांबले असता अचानक पाठीमागुन दुचाकीवरून आलेल्या फहिन नुरुद्दीन याने व्हॉट्सअपवर टाकण्यात आलेल्या, 'फहिम समझा क्या रे' हा स्टेटस टाकल्याचे कारणावरुन त्याने व इतर साथीदारांनी मिझान व मारुफ शेख यास हाताने,कमरेच्या बेल्टने व लाथा-बुक्क्यांनी पोटावर,पाठीवर,गळयावर, छातीवर शिवीगाळ करून मारहाण केली. त्याबाबत फिर्यादी हया नानापेठ पोलीस चौकी येथे तक्रार दिल्यानंतर चौकीच्या बाहेर रोडवर आल्यानंतर,सदर इसमांची तक्रार दिल्याचा राग मनात धरुन,सदर इसमांनी फिर्यादीचे पतीला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,मारुफ याचे छातीवर दगड फेकुन मारला. तसेच इतर महिला यांनी फिर्यादीस हाताने मारहान करुन जखमी केले. त्यानंतर जाताना त्यांनी फिर्यादीचे पती व मुले यांना तुमको खतम कर डालूँगा अशी धमकी दिली आहे. (दाखल केलेल्या अर्जावरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.हवा. एन.व्ही.धोत्रे ७५१७४९५१०२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ११८/१९,भादविक १४३,१४७,१४९,३२३,३३७,३५४,५०४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४६ वर्षे,रा.कागदीपुरा,पुणे |
| **आरोपी** | १.एक महिला,वय-४४ वर्षे,रा.भवानी पेठ,पुणे २.इरफान समद शेख,वय-३० वर्षे,रा.८९२,कसबा पेठ,कागदीपुरा,पुणे (अटक) व दोन विधीसंघर्षीत बालक (ताब्यात नाही) तसेच इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०४/२०१९ रोजी २०/०० वा. नानापेठ पोलीस चौकी समोर इनामदार चौक,नानापेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | मिझार याचे व्हाटसअपचे संदर्भात फिर्यादी यांचा मुलगा फहीम आणि मिजान यांच्यात झालेल्या भांडणाच्या कारणावरुन,यातील नमुद इसम व महिला यांनी नाना पेठ पोलीस चौकी समोर इनामदार चौक,नानापेठ,पुणे येथे यांनी फिर्यादी यांचे पती नुरुद्दीन यांस चहाचा कप फेकुन मारुन जखमी केले. तसेच फिर्यादी यांची दोन मुलेफहीम व मोहीम यांना व त्यांचे मेव्हण्याची पत्नी हिस शिवीगाळ व हाताने मारहाण करून,इरफान शेख याने फिर्यादी यांचा विनयभंग केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिकलगार ९८२२१३७६९६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ९३/१९,भादविक ४२०,४०८,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३० वर्षे,रा.दापोडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ ते दि.३०/१०/२०१८ रोजीपर्यंत जितुभाई वेअर हाऊस स.नं.६२७/१के/३/१ गंगाधाम रोड,नियर सिध्देशवर मंदिर,मार्केटयार्ड,पुणे या ॲमेझॉन डिपेंडो डिलेव्हिरी सेंटर मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची कपंनी ऑनलाईन वस्तु विक्री करणा-या ॲमेझॉन या कपंनीच्या वस्तु कस्टमर पर्यंत पोहचवण्याचे काम करते. यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचे कपंनीत माल डिलीव्हर करण्याचे काम करीत होते. सदर इसमाने प्रत्यक्षात माल कस्टमरला दिल्यानंतर त्यांचेकडून त्या मालाची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांनी त्यांचे मोबाईल ॲप मध्ये असलेल्या डिलिव्हर टू कस्टमर या ऑपशनला प्रेस करणे अपेक्षित असताना,त्यांनी त्या ऑपशनवर प्रेस न करता अनस्केस ॲटेमवर प्रेस करीत होते. ही माहिती फिर्यादी यांचे कॉम्प्युटर सिस्टीमवर ॲटोमेटिक अपडेट होत होती. पंरतु सदर इसमांना फिर्यादी यांचे कपंनीचे सिस्टीमाचा पासवर्ड माहिती असल्याने,त्याचा वापर इतर कुठल्यातरी डिव्हाईस मध्ये करून त्यांनी सिस्टीमवर अनस्केस मालाची माहिती डिलीट करून,तोच माल गोडावुन मध्ये जमा करण्यात आला आहे अशी खोटी माहिती अपडेट करीत होता. तरी यातील आरोपी क्रं १,२,३ यानी प्रत्यक्षात संगणमताने ३,१५,७२५. रू.चे मोबाईल, घडयाळ व इतर लहान सहान वस्तू प्रत्यक्षात कस्टमरला विकून त्याची रक्कम स्विकारली ती कंपनीस जमा केली नाही व सिस्टीम मध्ये तो माल विकला गेला नसून तो गोडावून मध्ये जमा करण्यात आला आहे अशी खोटी माहिती सिस्टीमवर त्यांना कपंनीचा माहिती असलेल्या पासवर्डचा वापर करून,मुळ माहिती मध्ये फेरफार करून खोटी माहिती अपडेट केली,म्हणुन सदर बाबत प्राप्त तक्रारी अर्जाची चौकशी करून याबाबत मा.सरकारी अभियोक्ता यांची परवानागी प्राप्त करून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. संभाजी निंबाळकर ९८२३५७८६५४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**